मंत्रालयीन विभाग व त्याच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयामध्ये “शिष्टाचार अधिकारी” नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
राजशिष्टाचार विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: - टीआरएस-२०२६/प्र.क्र.५८/राशि-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- महाराष्ट्र राज्य अतिथी नियम-२००४.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्य अतिथी नियम - २००४ मधील जोडपत्र-क मध्ये नमूद अति अति महत्त्वाच्या मान्यवरांना राज्य अतिथी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच तद्नंतर वेळोवेळी राज्य शासनाच्या मान्यतेने काही अति अति महत्त्वाच्या मान्यवरांना राज्य अतिथी म्हणून घोषित केले आहे. सदर राज्य अतिथी यांचे राजशिष्टाचार विभागाकडून मुंबई विमानतळावर आगमनावेळी स्वागत करण्यात येते व निर्गमनावेळी निरोप देण्यात येतो. राज्य अतिथींच्या यादीमध्ये समावेश नसलेल्या अति महत्त्वाच्या मान्यवर, तसेच अनेक मंत्रालयीन विभागातील अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभागाशी संबंधित शिष्टमंडळ, मंत्रालयीन विभागाशी संबंधित काही अतिथी यांना राजशिष्टाचार विषयक सुविधा देताना अनेकदा विशेष राजशिष्टाचार अधिकारी, विमानतळ नियंत्रण कक्ष यांच्यावर अतिरिक्त ताण पडतो. सबब, राज्य अतिथीच्या यादीमध्ये समावेश नसलेल्या उपरोक्त मान्यवरांना छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आगमनावेळी स्वागत करणे व निर्गमनावेळी निरोप देणे, अशा प्रकारची राजशिष्टाचार विषयक सुविधा देण्यासाठी संबंधित विभागामार्फत “शिष्टाचार अधिकारी”घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

२. महाराष्ट्र राज्य अतिथी नियम-२००४ मधील जोडपत्र-क मध्ये नमूद केलेले राज्य अतिथी व्यतिरिक्त अन्य अति महत्त्वाच्या मान्यवरांना छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे राजशिष्टाचार विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. मंत्रालयीन सर्व विभागांनी आपल्या विभागांतर्गत १ अवर सचिव व १ कक्ष अधिकारी दर्जाचे अधिकारी यांना विभागाचे “शिष्टाचार अधिकारी” म्हणून घोषित करावे.

२. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आगमन व निर्गमन करणाऱ्या मान्यवरांची वर्दी यशस्वीरित्या हाताळण्यासाठी मंत्रालयीन सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त असलेल्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयांमध्ये देखील अवर सचिव व कक्ष अधिकारी समकक्ष असलेल्या अधिकाऱ्यांना त्या कार्यालयाचे “शिष्टाचार अधिकारी” म्हणून घोषित करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

३. मान्यवरांची वर्दी यशस्वीरीत्या हाताळण्याकरिता मान्यवरांना शिष्टाचार विषयक कोणकोणत्या सुविधा देणे आवश्यक असते, त्याकरिता विमानतळ येथील कोणत्या यंत्रणेसमवेत समन्वय करणे आवश्यक आहे, या व इतर संबंधित मुद्द्यांच्या अनुषंगाने मंत्रालयीन अथवा त्यांच्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाने घोषित केलेल्या शिष्टाचार अधिकारी यांना राजशिष्टाचार विभागाच्या अंतर्गत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नियंत्रण कक्षातील विशेष राजशिष्टाचार अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्यात येईल.

४. मंत्रालयीन अथवा त्यांच्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाने घोषित केलेल्या शिष्टाचार अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या अति अति महत्त्वाच्या मान्यवरांच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन व निर्गमनावेळी प्रत्यक्ष उपस्थित राहून, त्यांना शिष्टाचार विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

५. मंत्रालयीन सर्व विभागांनी आपल्या विभागांतर्गत घोषित करण्यात आलेल्या "शिष्टाचार अधिकारी" यांचेबाबतीत विभागाचे नाव, शिष्टाचार अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अशा प्रकारचा तपशिल राजशिष्टाचार विभाग / कार्यासन राशि-२ यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात यावा. सदर माहिती Word File (soft copy) Sakal Marathi या फॉन्टमध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.

६. आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या अति महत्त्वाच्या मान्यवरांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई / नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन व निर्गमनाच्या २ दिवस अगोदर राजशिष्टाचार विभागास (TRS कक्ष) तसेच या विभागाच्या ई-मेल (gadproto-mh@nic.in) आयडीवर पत्रान्वये कळविण्यात यावे. तद्नंतर संबंधित विभागाच्या शिष्टाचार अधिकाऱ्यांना एअरपोर्ट एन्ट्री पास (Airport Entry Pass) करिता राजशिष्टाचार विभागाकडून शिफारस पत्र देण्यात येईल.

७. सदर पत्र संबंधित विभागाच्या शिष्टाचार अधिकाऱ्यांनी विमानतळ येथील नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो (Bureau of Civil Aviation Security) यांच्याकडे जमा करुन एअरपोर्ट एन्ट्री पास (Airport Entry Pass) उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी घोषित केलेल्या संबंधित विभागाच्या राजशिष्टाचार अधिकारी यांची राहील.

३. सर्व विभागांनी वरीलप्रमाणे एक महिन्याच्या आत कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून याचा संकेतांक २०२६०८२५१७०९२१८८३७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2026.08.25 17:10:32 +05'30'

(चंद्रकांत कृ. मोरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (राजशिष्टाचार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व सह सचिव / उप सचिव (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव / कक्ष अधिकारी (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती.